सकाळ TODAY

मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ | पुणे

SakalNews SakalMediaNews www.esakal.com

• Registered • Date of Publication : मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.

# ‘पीआयसीटी मॉडेल’, ‘एअर फोर्स’ची प्रतिस्पर्ध्यांवर मात

## शालेय फुटबॉल स्पर्धा : सिटी इंटरनॅशनल, मातोश्री, अमानोरा स्कूलचे विजय



**बीएमसीसी मैदान :** शालेय फुटबॉल स्पर्धेत सतरा वर्षांखालील मुलांच्या गटात सातारारोडच्या सिटी इंन्टरनॅशनल स्कूल आणि ग्लोबल इंडियन इन्टरनॅशनल स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यातील एक चुरशीचा क्षण

**पुणे, ता. १९ : शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित सतरा वर्षांखालील मुलांच्या गटाच्या शालेय फुटबॉल स्पर्धेत पीआयसीटी मॉडेल स्कूल, एअर फोर्स, सिटी इंटरनॅशनल, मातोश्री, अमानोरा स्कूलने प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले. या स्पर्धेत अहद तांबोळीने हॅटट्रिक नोंदवली.**

बीएमसीसी आणि फग्युर्सन महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत पीआयसीटी मॉडेल स्कूलने बी.व्ही. बी. परांजपे सेकंडरीचा ३-० असा पराभव केला यावेळी रणवीर पाटील (६ वे मिनिट), आदित्य पाटील (९ वे मिनिट) ऋषील चाटीने (२९ वे मिनिट) प्रत्येकी एक गोल केला.

अमन कुमारने खेळाच्या दहाव्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर चंदननगरच्या एअर फोर्स स्कूलने स्टेला मारीस स्कूलचा पराभव केला. सातारा रोडच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलने ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूलचा सडनडेथमध्ये ९-८ अशा गोलने पराभव केला. नियोजित वेळेत सामना गोलशून्य बरोबरीत सुटल्याने टायब्रेकचा अवलंब करावा लागला टायब्रेकमध्ये सिटी इंटरनॅशनलच्या जय बुलबुले वगळता भास्कर बैस, नमन लोढा, आदित्या प्रसाद व संचित कवचाळेने गोल केले. तर ग्लोबल इंडियनकडून नैतिक वाघेल, स्पर्श कुंजीर, निपुण इनामदार व आयुष गुरवने गोल केले. टायब्रेकही ४-४ असा बरोबरीत सुटल्याने सडनडेथचा अवलंब करावा लागला. सडनडेथमध्ये सिटी इंटरनॅशनलच्या हृदय कोठारी, यश जैन, शिवम सागरे, गणेश प्रजापतीने गोल केले तर ग्लोबल इंडियन स्कूलकडून आक्षित मिश्रा व आरव लालने गोल केले तर कौस्तुभ चिटे गोल करण्यात अपयशी ठरला. मनसुखभाई कोठारी नॅशनल स्कूलने कोथरूडच्या सिटी इंटरनॅशनलचा टायब्रेकमध्ये ५-३ असा पराभव केला नियोजित वेळेत दोन्ही संघातील खेळाडूंनी तोडीस तोड खेळ केला परंतु सामना गोलशून्य बरोबरीत सुटल्याने टायब्रेकचा अवलंब करावा लागला टायब्रेकमध्ये मननसुखभाई कोठारी स्कूलच्या आदिल शेख, फुजेल बेग, पक्षल ओसवाल, शुबान सेन व ताहेर सईदने गोल केले तर सिटी इंटरनॅशनलकडून दिव्येश इधाटे वगळता हर्षवर्धन क्षिरसागर, शंतनू निखारे, अथर्व दोरखंडेने गोल केले.

हर्ष राठोडने २१ व्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर मातोश्री इंग्रजी माध्यम स्कूलने एज्यूकॉन इंटरनॅशनल स्कूलचा पराभव केला. आरूष गुप्ता (१९ वे मिनिट) व रेयांशसिंगने (२४ वे मिनिट) केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर अमानोरा स्कूलने जे. पी. ट्रस्टच्या विद्यानिकेतन स्कूलचा २-० असा पराभव केला. राणा पवार (६ वे मिनिट) व मल्हार दरेकरने (९ वे मिनिट) केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर विद्याभवन स्कूलने वाघोलीच्या द लेक्सिकॉन स्कूलवर २-० असा विजय मिळविला. अहद तांबोळीने हॅटट्रिकसह केलेल्या (७, १० व १५ वे मिनिट) तीन गोलच्या जोरावर कोंढवाच्या सिंहगड सिटी प्रशालेने माऊंट मेरी स्कूलचा ४-० असा पराभव केला अहदला नहुश मानेने (२३ वे मिनिट) एक गोल करून सुरेख साथ दिली. हर्ष पोटफोडेने २४ व्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर डी.ई.एस. स्कूलने डॉ. मारथिओफिलस स्कूलला हरविले. मानससिंगने (१० व २२ वे मिनिट) दोन तर साहिल परदेशीने (४ थे मिनिट) केलेल्या एक गोलच्या जोरावर कोठारी इंटरनॅशनल स्कूलने साळुंके विहार येथील रोजरी स्कूलचा ३-० असा पराभव केला. हडपसरच्या सिग्नेट पब्लिक स्कूलने येरवडाच्या व्हिबग्योर प्रशालेचा २-० असा पराभव केला यावेळी ओंकार चौधरी (७ वे मिनिट) व स्वरूप पायमल्लेने (१७ वे मिनिट) प्रत्येकी एक गोल केला.